# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### कृष्णा-कोयना सिंचन प्रकल्पाच्या खंडेराजुरी येथील शाखा कालव्यावरील सी.डी.वर्क बाबत

**(१) १४०९७ (०७-०४-२०१५). डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्याला दुष्काळी वरदान ठरणाऱ्या कृष्णा-कोयना सिंचना प्रकल्पाची खंडेराजुरी ता.मिरज येथील शाखा कालव्यावर ९ सी.डी.वर्क मंजुर असुन सन १४-१३-१२-२०११ अखेर पुर्ण केलेले नाहीत, हे खरे आहे काय, उद्‌भवत

(२) असल्यास, याठिकाणी वाडी वस्तीवर राहणा-या लोकांना कालव्यावरून ये-जा करण्यासाठी सी.डी.वर्क नाहीत ती किती कालवधीत पुर्ण करणार,

(३) असल्यास, आजअखेरी हि सी.डी.वर्क का पुर्ण झाली नाहीत व याला जबाबदार अधिका-यांवर शासनाने तातडीने कार्यवाही,

(४) असल्यास, तसेच ही डोंगरवाडी योजना केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. एकूण ८ पैकी ५ सी.डी.वर्क्सची कामे पूर्ण झाली आहेत. याशिवाय १ काम अधिजल मार्गाचे असून त्यासत सुरुवात झालेली नाही.

(२) खंडेराजुरी कालव्यावरील ९ पैकी ८ सी.डी. वर्क ही गाव रस्ता पूलाची व १ अधिजल मार्गाचे आहे. पूलांपैकी ५ पूर्ण आहेत ३ कामांची निविदा प्रक्रिया चालू आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार सदर ३ कामे पूर्ण करण्यात येतील. या उर्वरित गावारस्ता पुलांसाठी तात्पुरते पाईप टाकून वाहतूकीची सोय केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) डोंगरवाडी उपसा सिंचन योजनेची शीर्षकामे पूर्ण झाली असून योजना कार्यान्वित झालेली आहे. कालव्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. या योजनेच्या एकूण ६१५७ हे .पैकी ४९७७ हे सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे पूर्ण करणेत येतील.

---

**मिरज(जि.सांगली) तालुक्यातील पंचायत समितीमधून**
**कलाकार मानधनाचे प्रस्ताव गहाळ झाल्याबाबत**

**(२) १४१०८ (०७-०४-२०१५). डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील पंचायत समितीमधून कलाकार मानधनाचे प्रस्ताव माहे एप्रिल, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जय गंगातारा सांस्कृतिक संघटनेच्या माध्यमातून सन २००३ पासून ५०० प्रस्ताव दाखल केले आहेत तसेच मिरज पंचायत समिती गटविकास अधिकारी व संघटनेच्या पदाधिका-यांसोबत वादविवाद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) जय गंगातारा सांस्कृतिक संघटनेच्या माध्यमातून अंदाजे ५०० प्रस्ताव मिरज पंचायत गट विकास अधिकारी यांना प्राप्त झाले असून त्याची छाननी करुन पात्र कलावंताचे प्रस्ताव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले. त्यापैकी जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या मानधन योजनेचा लाभ देण्यात येतो.

मिरज पंचायत समिती, गट विकास अधिकारी व जय गंगातारा संघटनेच्या पदाधिकाऱ्या सोबत कोणताही वादविवाद झालेला नसल्याचे गट विकास अधिकारी, पंचयात सामिती, मिरज यांनी कळविले आहे.

---

**सांगली जिल्हयातील मिरज-कृष्णाघाट व मिरज-बेडग रस्त्यावर**
**रेल्वे मार्गावर उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(३) १४११० (१०-०४-२०१५). डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील मिरज-कृष्णाघाट व मिरज-बेडग रस्त्यावर रेल्वे मार्गावर उड्डाणपूल बांधण्यात यावा या मागणीसाठी नागरिकांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास कृष्णाघाट रस्त्यावरील रेल्वे गेटजवळ निदर्शने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याबाबत गेल्या अनेक वर्षापासून मागणी होऊनही राज्य शासन व रेल्वेने या मागणीची दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मिरज-कृष्णघाट रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपूलाचा प्रस्ताव रेल्वे विभागाकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

मिरज-बेडग रस्त्यावर १ लक्ष टीव्हीयु पेक्षा कमी वाहतूक असल्याने रेल्वे उड्डाणपुलाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला नाही.

---

**मिरज शासकीय दुध (जि.सांगली, ता.मिरज) योजनेमध्ये कर्मचा-यांना सन २००९ चे पगारी सुट्ट्याचे वेतन मिळत नसल्याबाबत**

**(४) १४१२० (३०-०४-२०१५). डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील मिरज शासकीय दुध योजनेमध्ये कर्मचा-यांना सन २००९ पगारी सुट्ट्याचे वेतन मिळत नसल्याने .लोकप्रतिनिधी मिरज यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१४ रोजी मा.पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय मंत्री यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय दुध योजना मिरज येथील अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना पगारी सुट्टयाचे वेतन मिळणेसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) दूध संकलन निरंक असलेल्या दिवशी पगारी सुट्टया देण्याबाबत महालेखापाल,मुंबई यांनी सन २००९-२०१० या वर्षातील लेखापरीक्षणामध्ये आक्षेप नोंदविला होता. त्यामुळे दूध संकलन नसलेल्या दिवशी आलेल्या पगारी सुट्टयांचे वेतन स्थगित ठेवण्यात आले होते. महालेखापाल, मुंबई यांना लेखापरिक्षण आक्षेपाचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आल्यानंतर त्यांचेतर्फे तो निकाली काढण्यात आलेला आहे. सदर कर्मचाऱ्यांना थकीत पगारी सुट्टयांचे वेतन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नवीन पनवेल येथे महाराणा प्रताप बटालियन संघटनेने महात्मा गांधीची हत्या करणा-या गोडसेचा जयजयकार केल्याबाबत**

**(५) १४१४९ (०८-०४-२०१५). श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या स्मृतिदिनांनिमित्त देशभरात अभिवादन करण्यात येत असतांना नवीन पनवेल येथे महाराणा प्रताप बटालियन संघटनेने कार्यक्रम घेऊन राष्ट्रपित्याची हत्या करणा-या गोडसेचा जयजयकार केल्याची घटना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रताप बटालियन संघटनेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१५) :** (१) होय.
(२) सदर कार्यक्रमामुळे होणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून फौजदारी दंडप्रक्रिया संहिता कलम १४९ प्रमाणे रितसदर नोटीस जारी करण्यता आली होती. सदर प्रकरणी दिनांक ३१.१.२०१५ रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.६/२०१५ भारतीय दंडविधान संहिता कलम १८८ प्रमाणे महाराणा प्रताप बटालियन संघटनेचा राष्ट्रीय अध्यक्ष श्री. ठाकूर अजयसिंग सेंगर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात दिनांक २०.३.२०१५ रोजी त्यास अटक करण्यात आली असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वनविभागाच्या जागेवरील अनधिकृत अतिक्रमण**

**(६) १४१८१ (०८-०४-२०१५). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विभागाच्या व राष्ट्रीय उद्यान परिसरात मानवी आक्रमण व अनधिकृत वस्त्या वाढत असल्याने वन्य प्राण्यांना मोकळी जागा मिळत नाही त्यामुळे वन्य प्राणी नागरी वस्त्यांमध्ये शिरून दिसेल त्याचेवर हल्ले करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरिवली (प.) मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्याना अंतर्गत येत असलेल्या ठाणे, चेना व घोडबंदर या तीन परिमंडळामध्ये १० हजारापेक्षा अधिक अतिक्रमणे उभी राहिली असल्याचे वन विभागाने २०१४ साली केलेल्या सर्व्हेमधून स्पष्ट झाले असल्याचे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरात झालेल्या अतिक्रमणामुळे पर्यावरणही बिघडते याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) वनक्षेत्रपाल येऊर यांनी माहे जानेवारी, २०१२ मध्ये केलेल्या नोंदीनुसार व जानेवारी, २०१५ मध्ये प्रत्यक्षात केलेल्या पाहाणीनुसार ठाणे, चेना व घोडबंदर या परिमंडळात सुमारे ७,००० अतिक्रमणे निदर्शनास आली आहेत.
(३) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मध्ये दिलेलया निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनजमिनीवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे निष्कासित करुन वनजमीन अतिक्रमणमुक्त करणे व शासन धोरणानुसार ०१.०१.१९९५ पूर्वीच्या पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करुन त्यांच्या झोपड्या निष्कासित करण्यात येत आहे.

---

**मुंबई बंगळुरु महामार्गावर कात्रज बोगदा ते न-हे**
**पुलादरम्यान होत असलेले अपघात**

**(७) १४१८५ (१०-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबई बंगळुरु महामार्गावर कात्रज बोगदा ते न-हे पुलादरम्यान मानवी चुका, महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष आणि चुकीचे इन्फ्रास्ट्रक्चर यामुळे निरापधारांचे बळी जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाहतुक पोलीसांनी अपघातप्रवण क्षेत्र आणि रस्त्यांमधील दुरुस्तीसंदर्भात अहवाल दिला आहे का, दिला असल्यास काय कार्यवाही करण्यात आली,

(३) तसेच वाहतुक पोलीस शाखेकडून वारंवार सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक असलेल्या प्राथमिक उपाययोजना देऊन सुध्दा प्राधिकरणाकडून संबंधीत ठेकेदाराकडून काहीच कार्यवाही होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधीत ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याकरीता वाहतुक पोलीस यांच्या समवेत संयुक्त पहाणी करण्यात आलेली आहे. वाहतुक पोलीसामार्फत सुचविण्यात आलेल्या उपाययोजना सवलतदार यांनी स्वतंत्र तंत्रज्ञाच्या सल्ल्याने करारनाम्यातील तरतुदीनुसार अमलात आणलेल्या आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील खडकवासला, पानशेत धरणे उपाययोना**
**अभावी असुरक्षित असल्याबाबत**

**(८) १४१९१ (०८-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खडकवासला, पानशेत धरणे उपाययोजनां अभावी असुरक्षित आहेत हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे अपरात्री दुर्घटना घडली किंवा घडवून आणल्यास १५ मिनिटांत पुणे शहर पाण्याखाली जाऊ शकते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याच अनुषंगाने धरण सुरक्षा, धरण संरक्षण तसेच सशस्त्र पोलीस गस्ती यासारख्या उपाययोजना शासनाकडून करण्यात आल्या नाहीत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काय उपाययोजना शासनाच्या वतीने करण्यात आल्या व करण्यात येणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) खडकवासला व पानशेत धरणावर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलिस खात्याकडून सशस्त्र पोलिस यंत्रणा कार्यरत आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील हडपसर मधलजया मगरपाट्टा परिसरातील सिझान मॉलमध्ये बेकायदा मद्य विक्रि सुरु असल्याबाबत**

**(९) १४१९८ (०७-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हडपसर मधल्या मगरपाट्टा परिसरातील सिझन मॉलमध्ये बेकायदा मद्य विक्रि करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२)असल्यास, पुणे शहरात व जिल्ह्यात उत्पादन शुल्क विभागाकडे किती मद्य विक्रि करणा-या हॉटेलच्या नोंदी आहेत,

(३) असल्यास, उत्पादन शुल्क विभागाकडून संबंधीत दोषी हॉटेल चालकांवर कारवाई करण्यात आली काय असल्यास कोणती,

(४) तसेच बेकायदा मद्य विक्री करणा-या हॉटेलची माहिती गोळा करुन कारवाई करण्यासाठी कोणत्या पथकाची नेमणूक करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०५-२०१५) :**(१) हडपसर, पुणे येथील सिझन मॉलच्या दुस-या मजल्यावर हॉटेल किंवा ब्रिव येथे विदेशी मद्य तसेच भारतीय बनावटीचे विदेशी मद्य अवैधरित्या व विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने साठा केल्याचे दि.३.२.२०१५ रोजी आढळून आल्याने त्याविरुध्द गुन्हा क्र.२५/२०१५ नोंदवून अंदाजे रु. २,६४,१८५/- किंमतीचा मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे,

(२) मुंबई विदेशी मद्य नियमावली १९५३ च्या तरतूदीनुसार पुणे जिल्ह्यात मद्य विक्री करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना एकूण १३७७ नमुना एफएल-३ अनुज्ञप्ती मंजूर आहेत,

(३) अवैधरित्या मद्य विक्री करणा-यांवर तथा हॉटेल चालकांवर महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम अन्वये पुणे जिल्ह्यात जानेवारी, २०१४ ते मार्च, २०१४ अखेर एकूण ५५१ हॉटेल/ढाब्यांवर कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये ५३९ आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे १.०२ कोटी रुपये किंमतीचा मद्यसाठा जप्त करण्यात आलेला आहे,

(४) बेकायदा मद्य विक्री करणाऱ्या हॉटेलची माहिती गोळा करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी पुणे जिल्ह्यात २ भरारी पथके कार्यरत असुन १२ कार्यकारी निरीक्षकांचे घटक देखील त्यांच्या-त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमितपणे कार्यरत आहेत. याशिवाय विभागीय स्तरावर एक आणि राज्यस्तरावर एक भरारी पथक देखील कार्यरत आहेत,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरात अन्न धान्य व रॉकेलचा पुरवठा शिधावाटप दुकानांमधून वेळेवर केला होत नसल्याबाबत

**(१०) १४२०१ (०७-०४-२०१५). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरात अन्न धान्य व रॉकेल पुरवठा शिधावाटप दुकानांमधून वेळेवर केला जात नसल्याचे तसेच धान्य पुरवठ्यामध्ये दोष असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पुरवठा विभागाकडून कोथरुड परिसरात वितरीत करण्यात आलेल्या धान्य पुरवठ्यामध्ये खडे, किडे, प्लॅस्टिक, धातूचे तुकडे मिश्रित धान्य वाटप केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिधावाटप दुकानदारांना पुरवठा विभागाकडून वेळेत धान्य पुरवठा होतो काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शिधापत्रिका धारकांना वेळेत धान्य पुरवठा वितरित न करणा-या शिधावाटप दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :**(१) नाही.
(२) हे खरे नाही. तथापि, पुणे शहर कार्यालयाचे अधिनस्त परिमंडळ कार्यालय "क" विभागामधील कोथरुड भाग-२ मधील वारजे येथून एका नागरिकाने भ्रमणध्वनीवरुन तक्रार केल्यामुळे अन्न धान्य वितरण अधिकारी, पुणे कार्यालयाचे पुरवठा निरीक्षक यांनी वारजे येथील स्वस्त धान्य क्र.१३ या स्वस्त धान्य दुकानाची तपासणी करताना माहे एप्रिल, २०१५ करिता मंजूर करण्यात आलेल्या ७४ क्विंटल तांदूळापैकी ६ क्विंटल काळपट झालेला होता. सदर तांदळाचे वाटप न करण्याच्या संबंधिताना सूचना देऊन सदर तांदूळ स्वच्छ करुन किंवा FCI गोदामामधून बदली करुन नंतर शिधापत्रिकाधारकांना धान्य वाटप करण्यात यावे. या प्रकाराच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टाटा मोटर्स लिमिटेड पिंपरी चिंचवड, पुणे मधील तात्पुरते कामगारांवर झालेला अन्याय

**(११) १४२०७ (०७-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड पुणे, येथील टाटा मोटार्स कंपनी मध्ये सन १९९७ ते २००० या वर्षात कंपनीमध्ये कामावर असलेले कामगार व काही तात्पुरते कामगार सुध्दा होते, त्यातील काही कामगारांना २ व ३ पिरीयड कंपनीने दिले असून ४ था पिरीयड कंपनीने दिलेला नाही, त्यामुळे सदर कामावर असलेल्या कामगारांवर अन्याय झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्यायग्रस्त कामगारांना कामावर रुजु करुन घेणेबाबतचे प्रकरण कामगार उपायुक्त, पुणे जि.पुणे येथे ७ ते ८ वर्षापासून सुरु असून अद्यापपर्यंत सदर कामगारांना कोणत्याच प्रकारचा न्याय मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्याबाबत प्रकरण तात्काळ निकाली काढून कामगारांना न्याय देण्यात यावा अश्या प्रकारचे लेखी निवेदन मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०६-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

टाटा मोटर्स लि. या कंपनीकडे २, ३ व ४ पिरीयड असा काही प्रकार नसून कंपनीद्वारे आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या प्रकारच्या गाड्यासाठी असलेल्या मागणीप्रमाणे ज्या प्रकारच्या तात्पुरत्या स्वरुपाच्या कामगारांची गरज पडेल त्या प्रकारच्या कामगारांना त्या त्या वेळी काही कालावधीसाठी कामावर घेण्यात येते.

(२) कामगारांना कामावरुन कमी केल्याबाबत औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २-अ अन्वये केलेल्या तक्रारींसंदर्भातील कामगार उप आयुक्त, पुणे यांनी सन २००६, २००७ व २००८ या कालावधीत ३८९ प्रकरणे अभिनिर्णयार्थ मा.कामगार न्यायालयाकडे पाठविलेली असून त्यापैकी आतापर्यात निकाल लागलेल्या १०९ प्रकरणांचा निकाल हा व्यवस्थपनाच्या बाजुने लागलेला आहे. उर्वरित प्रकरणे ही मा.कामगार न्यायालयात प्रलंबित आहेत.

(३) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मास्टर ऑफ बिझनेस (एमबीए) शिक्षण देणा-या देशभरातील १४७ महाविद्यालयांपैकी राज्यातील २४ महाविद्यालये बंद करावी लागल्याबाबत**

**(१२) १४२०९ (०९-०४-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मास्टर ऑफ बिझनेस (एमबीए) शिक्षण देणा-या देशभरातील १४७ महाविद्यालयांपैकी राज्यातील २४ महाविद्यालये बंद करावी लागली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील काही इंजिनिअरिंग महाविद्यालयांनी त्यांचेकडे सुरु केलेले एमबीए अभ्यासक्रम बंद केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) नाही. फक्त १२ संस्थातील एम.बी.ए. अभ्यासक्रम सन २०१४-१५ पासून त्यांचेकडे सुरु केलेले एम.बी.ए. अभ्यासक्रम बंद केले आहेत,

(२) राज्यातील १२ इंजिनिअरिंग महाविद्यालयांनी सन २०१४-१५ पासून त्यांचेकडे सुरु केलेले एम.बी.ए अभ्याक्रम बंद केले आहेत,

(३) विद्यार्थी संख्या घटल्यामुळे सदर अभ्यासक्रम बंद केले आहेत,

(४) सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होईपर्यंत संबंधित संस्थां जबाबदार राहील अशा आशयाचे संस्थेचे प्रतिज्ञापत्र प्राप्त करण्यात येते,

---

**जळगांव जिल्हा परिषद सेस योजना सन २०१४-१५ अंतर्गत अनुदानावर कृषि साहित्य वाटप करण्यासाठी लाभार्थी शेतक-यांची निवड प्रक्रिया उशिरापर्यंत चालल्यामुळे खरीप हंगामात कृषि साहित्याचे वाटप न झाल्याबाबत**

**(१३) १४२३२ (०७-०४-२०१५). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा परिषद सेस योजना सन २०१४-१५ अंतर्गत अनुदानावर कृषि साहित्य वाटप करण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांची निवड प्रक्रिया उशिरापर्यंत चालल्यामुळे खरीप हंगामात कृषि साहित्याचे वाटप झाले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया उशिराने होण्याची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

लाभार्थी निवडीची प्रक्रिया वेळेत पूर्ण झालेली होती. तथापि, जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता असल्याने साहित्य वाटपाची कार्यवाही तदनंतर करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, शिक्षक**
**यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१४) १४२४० (०८-०४-२०१५). श्री. जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन सांगली जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनने मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१५) :**(१) मा.मुख्यमंत्री कार्यालयात माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन प्राप्त झाल्याचे संगणक प्रणालीवर दिसून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहराला वीजपुरवाठा करण्या-या स्पॅन्को-एसएनडीएल कंपनीच्या**
**कार्यपध्दतीमुळे सामान्य ग्राहक त्रस्त झाल्याबाबत**

**(१५) १४२५६ (०८-०४-२०१५). श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराला वीजपुरवाठ करण्याचे कंत्राट स्पॅन्को - एसएनडीएल या कंपनीला देण्यात आले असून या कंपनीच्या कार्यपध्दतीमुळे सामान्य ग्राहक त्रस्त झाल्याने या कंपनीकडून वीजपुरवठ्याचे कंत्राट काढून घेण्यात यावे अशी मागणी नागपूर शहरातील लोकप्रतिनिधी, महापौर, नगरसेवकांनी, मा.पालकमंत्री , नागपूर जिल्हा, उर्जा मंत्र्यांकडे जानेवारी, २०१५ मध्ये शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार पालकमंत्र्यांनी सदरहू कंपनीचे तीन वर्षाचे प्रशासकीय ऑडिट करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधार कंपनी मर्या. यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समिती मे.एस.एन.डी.एल. नागपूरच्या विविध कामांचा आढावा घेऊन अभिप्राय सादर करणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसे प्रकल्पाअंतर्गत घोडेझरी वितरिकेवर कोट्यावधी खर्च झाल्याबाबत**

**(१६) १४२७७ (०८-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसे प्रकल्पाअंतर्गत घोडेझरी वितरिकेवर १४०० कोटी खर्च झाल्याचे डिसेंबर, २०१४ ला उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) तसेच,ही योजना बंद करण्यात आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद करण्यात आली असल्यास १४०० कोटी खर्च करण्याची आवश्यक होती काय,

(४) १४०० कोटीचे काम वाटप करण्यात आले असून, त्यातील करारनाम्यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार शासनाकडे करण्यात आली हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) घोडाझरी शाख कालव्यावर रु.८४४.११ कोटी खर्च झाला आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) गोसीखुर्द प्रकल्पाबाबत तक्रारींचे अनूषंगाने चौकशी करण्यासाठी शासनाने वडनेरे समिती नियुक्त केली होती. समिती निविदेच्या मूल्यांकनाबाबत आक्षेप नोंदविले आहेत.

(५) शासनाने नियुक्त केलेल्या वडनेरे समितीचे अहवालांवर आधारीत १५ अधिका-यांना शासनाने दोषारोपपत्र बजावले असुन विभागीय चौकशीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**भंडारा येथील जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडून आधारभुत धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आल्याबाबत**

**(१७) १४२७९ (१०-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडून सन २०११-१२ ते २०१३-१४ पर्यंत समितीचे कार्यक्षेत्रातील आधारभुत धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आली, हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर खरेदी धान्यावरील बाजार फी ची एकूण रक्कम समितीला मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्यावर वारंवार मागणी करुनही उक्त रक्कम अद्याप देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय तसेच सदर बाजार फी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर खरेदी धान्यावरील बाजार फी कधीपर्यंत देण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

हंगाम २०१३-१४ मध्ये संबंधित बाजार कार्यक्षेत्रात धानाच्या खरेदी संदर्भात अनियमितता आढळून आल्याने त्याबाबत चौकशी करण्यात आलीअसून आर्थिक नुकसानीबाबतची निश्चिती अद्यापही झालेली नाही. त्यामुळे बाजार समितीला बाजार फी ची रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

उपरोक्त चौकशीनुसार सबएजंट संस्था व मिलधारकांना काळ्या यादीत टाकण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे.

---

**भंडारा जिल्ह्यात सन २०१३ ते २०१४ पर्यंत भंडारा, तुमसर, मोहाडी या तालुक्यातील धान खरेदी केंद्रावर एकाच कुटुंबातील १० व्यक्तीच्या नावे २.५० लख क्विंटल धान 'ए' ग्रेडमध्ये खरेदी करण्यात आल्याबाबत**

**(१८) १४२८० (१०-४-२०१५) श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात सन २०१३ ते २०१४ पर्यंत भंडारा, तुमसर, मोहाडी या तालुक्यातील धान खरेदी केंद्रावर एकाच कुटुंबातील १० व्यक्तीच्या नावे २.५० लाख क्विंटल धान 'ए' ग्रेडमध्ये खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २.५० लाख क्विंटल मागे प्रती क्विंटल २०० रुपये बोनस त्याच व्यक्तींना देण्यात आला व धान हे खरेदी केंद्रावर न नेताच तसेच भरडाईचा टेंडर असूनही भरडाई न करताच बिले दाखविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणाबाबत कारवाई करण्याची मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-५-२०१५) :** (१) भंडारा जिल्ह्यातील भंडारा, तुमसर, मोहाडी, डोंगरगांव येथील खरेदी केंद्रांवर एकच आडनांव असलेल्या कुटूंबातील व्यक्तींकडून १,१५,००० क्विंटल “अ” ग्रेड धान खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते.
(२) हंगाम २०१३-१४ खरेदी करण्यात आलेल्या १,७५,८०७.८५ क्विंटल “अ” ग्रेड धानाकरिता रु..२००/- बोनस दिला आहे हे खरे आहे.

परंतु भरडाईचा टेंडर असूनही भरडाई न करताच बिले दाखविण्यात आले, हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी प्रथम मा.उपायुक्त (पुरवठा) नागपूर विभाग यांनी चौकशी केली असून तद्नंतर शासन आदेशानुसार विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित खरेदीदार सबएंजट संस्था व मिलधारक यांना मा.जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या आदेशान्वये काळ्या यादीत टाकण्यात आले असून संबंधितांचे खरेदीचे व भरडाईचे कामकाज बदं करण्यात आले आहे.

---

### तुमसर(जि. भंडारा) शहरात चोरी, घरफोड्यांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१९) १४२८८ (०७-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) शहरात चोरी, घरफोड्यांचे प्रमाण वाढले असून पोलीस अधिकारी तसेच इतर पोलीस कर्मचारी यांचे घरी सुध्दा चो-या झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये तीव्र स्वरुपाची भिती निर्माण झाली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी गुन्हेगारीस आळा घालण्याच्या दृष्टीने कमिटी स्थापन करण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, तुमसर यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) मा.श्री.चरण वाघमारे, वि.स.स. तुमसर यांनी दिलेल्या निवेदनानुसार तुमसर शहरातील प्रभाग निहाय आढावा घेण्यात आला असून इच्छुक नागरीकांची १२ प्रभागनिहाय यादी तयार करण्यात आली असून प्रत्येक प्रभाग कमिटी समन्वयक म्हणून पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

सदर कर्मचार हे लोकांच्या सपर्कात असून गुन्हे प्रतिबंधक व गुन्हे प्रकटीकरणात नागरीकांचा सहभाग वाढविण्याकडे लक्ष देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शासकीय, निमशासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबातील व्यक्तीला अनुकंपा तत्वावर नेमणुकातील विलंबाबाबत**

**(२०) १४२९० (०७-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यात शासकीय, निमशासकीय कर्मचा-यांचा सेवाकाळात मृत्यू झाल्यास कुटुंबातील एकाला अनुकंपा तत्वावर नेमणूक करण्यास अतिविलंब होऊन पात्र अनुकंपा धारकांचे वय वाढल्याने अपात्र झालेल्या व कुटुंबातील इतर पात्र व्यक्तीला अनुकंपा तत्वावरील नेमणूका देण्यास अतिविलंब होत असल्याने या बाबतीत शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय, निमशासकीय कर्मचा-यांचा सेवाकाळात मृत्यू झाल्यास कुटुंबातील एकाला अनुकंपा तत्वावर नेमणूक करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१५) : (**१) हे खरे नाही.

अनुकंपाधारकाच्या प्रतीक्षासूचीतील जास्तीत जास्त उमेदवारांना शासन सेवेत सामावून घेता यावे यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१०१०/प्र.क्र ३०८/१०/आठ, दिनांक ०६/१२/२०१० नुसार शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी या आधी असलेल्या ४० वर्ष या कमाल वयोमर्यादेत वाढ करुन ती वयाची ४५ वर्ष इतकी करण्यात आली आहे.

(२) व (३) अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीतील जास्तीत जास्त उमेदवारांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. ०१.०३.२०१४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी असलेली प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या ५ % पदांची मर्यादा शिथील करुन ती प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १० % इतकी केली आहे.

---

## सध्या प्रचलित जुन्याच पध्दतीनुसार पिक विमा काढला जाण्याचे उघडकीस आल्याबाबत

**(२१) १४२९१ (०७-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या प्रचलित जुन्याच पध्दतीनुसार पिक विमा काढला जाण्याचे माहे डिसेंबर २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) विमा कंपनी शेताचा वैयक्तिक विमा उतरविते परंतु नुकसान भरपाई देताना दहा गावांमध्ये नुकसान झाले किंवा नाही या निकषावर नुकसान भरपाई देते हे खरे आहे काय,

(३) या जाचक अटीमुळे नुकसानग्रस्त शेतक-यांना प्रत्यक्षात निकष लावून शेतक-यांना वेठीस धरण्याचे कारण काय,

(४) पीक विमा योजनेच्या अटीमध्ये सुधारणा केले नसल्याचे खरे आहे काय,

(५) यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते हे खरे आहे काय,

(६) पीक विम्याचा लाभ देतांना दहा गांवाचा नुकसानीचा निकष न लावता प्रत्यक्ष गावनिहाय नुकसानीचा निकष लावण्याबाबत सुधारणा करणार किंवा कसे,

(७) याप्रकरणी शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना स्पष्ट न करण्याचे कारण काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५)** :(१) राष्ट्रीय कृषि विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून सदर योजना राज्यात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राबविण्यात येते.

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना राज्यात क्षेत्र हा घटक धरून राबविण्यात येते. राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत निश्चित करण्यात येणारी नुकसान भरपाई ही पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त सरासरी उत्पन्नाच्या आधारे निश्चित केली जाते. योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी आवश्यक असणारे अधिसूचित पिकनिकाय व मंडळ/मंडळगटनिहाय सरासरी उत्पन्न निश्चित करण्यासाठी संबंधित मंडळात महसूल विभाग, कृषि विभाग व जिल्हा परिषद या यंत्रणामार्फत मंडळ/मंडलगट स्तरावर १२ पिक कापणी प्रयोग घेतले जातात. त्यापैकी किमान १० पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त झालेल्या मंडळ/मंडळगटनिहाय सरासरी उत्पन्नाची तुलना संबंधित मंडळ/मंडळ गटाच्या उंबरठा उत्पन्नाशी करुन कमी नुकसान भरपाई निश्चित केली जाते.

(३) राष्ट्रीय कृषि विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असल्याने या योजनेअंतर्गत अधिसूचित पिकासाठी अधिसूचित मंडळ/मंडळ गट अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये १२ पिक कापणी प्रयोगाचे किंवा तालुका/तालुका गट अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये १८ पिक कापणी प्रयोगाचे आयोजन करुन त्याद्वारे प्राप्त झालेले मंडळ/मंडळगटनिहाय किंवा तालुका/तालुकागटनिहाय सरासरी उत्पन्न व त्या मंडळ/मंडळगटाचे किंवा तालुका/तालुकागटाचे उंबरठा उत्पन्न या आधारे नुकसान भरपाई निश्चित करण्यात यावी अशी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यामुहे नुकसान भरपाई निश्चित करताना अधिसूचित मंडळ/मंडळगटामध्ये किंवा तालुका/तालुकागटामध्ये समाविष्ट गावांच्या उत्पन्नाचा निकष लावला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही. सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(५) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी १९९९-२००० पासून राज्य क्षेत्र हा घटक (Area Approach) धरुन राबविण्यात येत आहे. या योजनेत रब्बी १९९९-२००० पासुन रब्बी २०१४-१५ पर्यंत ४०१.१५ लाख शेतक-यांनी योजनेत सहभाग घेतला असून रक्कम रु. १२२२.६६ कोटी विमा हप्ता भरुन ३२२.४२ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले आहे. त्यापैकी रब्बी २०१३-१४ अखेरपर्यंत १०८.०० लाख शेतक-यांना रक्कम रु. २९३०.६२ कोटी नुकसान भरपाई या योजनेंतर्गत भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत देण्यात आली आहे. खरीप हंगाम २०१४ व रब्बी हंगाम २०१४-१५ ची नुकसान भरपाई निश्चित करण्याचे काम भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

(६) सदरची योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्या राबविण्यात येत आहे. गाव पातळीवर योजना राबावावयाची झाल्यास पीक कापणी प्रयोगांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन मनुष्यबळ अधिक लागेल व प्रशासकीय खर्चही प्रचंड वाढेल. त्यामुळे सदर योजना राबविणे व्यवहार्य ठरणार नाही. त्यामुळे गाव पातळीवर सदर योजना राबविणे शक्य नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ६३ अभियांत्रिकी महाविद्यालयातील एटीकेटी लागलेल्या ३५०० विद्यार्थ्यांनी जुन्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबतची केलेली मागणी

**(२२) १४३०३ (०९-०४-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ६३ अभियांत्रिकी महाविद्यालयातील एटीकेटी लागलेले ३५०० विद्यार्थी हे बीईच्या शेवटच्या वर्षाला असून नव्या सीबीजीएस अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याचा निर्णय मुंबई विद्यापीठाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियांत्रिकीच्या एटीकेटी विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ च्या नविन क्रेडीट आधारीत ग्रेडींग पध्दतीच्या (सीबीजीएम) अभ्यासक्रमाऐवजी जुन्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षा घ्यावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार जुन्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षा घ्यावी याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) दि. २६ ऑगस्ट, २०१३ च्या परिपत्रकानुसार जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम पूर्ण करावा असा निर्णय घेतला होता. तथापि, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाच्या तंत्रज्ञान शाखा व विद्यापीठाच्या विद्वत सभेत दि. २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार सदर विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून जुन्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षेला बसू शकतील व नवीन अभ्यासक्रमाचाही विकल्प देण्यात आलेला आहे.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील कोलम या आदिवासी जमातीमध्ये कुमारी मातांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(२३) १४३१४ (०८-०४-२०१५). श्री. राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील कोलम या आदिवासी जमातीमध्ये कुमारी मातांचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील कोलम या आदिवासी जमातीमधील कुमारी मातांचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) जिल्ह्यातील कुमारी मातांचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कुमारी माता राहत असलेल्या गावात दवंडी, पत्रके वितरण, पोलिस पाटील यांची सभा तसेच पो.स्टे.स्तरावर तालुका दंडाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तंटामुक्त समितीच्या सभा घेऊन, कुमारी मातांना त्यांचेवर लादलेल्या मातृत्वाबाबत जनजागृती करुन त्यांना असलेले कायदेशीर अधिकाराबाबत माहिती देण्यात आलेली आहे, त्यावरुन २ कुमारी मातांचा प्रथम खबरी अहवाल पोलिस स्टेशान मध्ये दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे अंतर्गत येणा-या अंगणवाडी सेविकामार्फत देखील कुमारी मातांसारख्या घटना अजून घडू नयेत, म्हणून मार्गदर्शन व जनजागृती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील अपंग मुलांना नियमित शिक्षण देण्याची सोय नसल्याबाबत**

**(२४) १४३४७ (०९-०४-२०१५). श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील हजारो अपंग मुले असून त्यांना नियमित शिक्षण देण्याची सोय नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अपंग मुलांना नियमित शिक्षण मिळावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे. विशेष गरज असणा-या बालकांना वेगळ्या शाळेमध्ये न ठेवता नियमित वर्गातच वर्ग शिक्षकांमार्फत अध्यापन केले जाते. शिवाय सातारा जिल्ह्यतील वर्ग शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी ६० विशेष शिक्षक आणि प्रत्येक तालुक्यास २ याप्रमाणे ११ तालुक्यासाठी २२ विषयतज्ञ उपलबध करुन देण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिन्यासाठी**
**२०० कोटीचे कर्ज घेतल्याबाबत**

**(२५) १४३७९ (०८-०४-२०१५). श्री. प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनीसाठी आय.डी.बी.आय बँकेकडून २०० कोटी कर्ज घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्ज प्रकरणाच्या अटी शर्तीनुसार मालमत्ता तारण देण्यास दिरंगाई केल्याने बँकेने १ टक्के प्रमाणे प्रतिवर्ष २ कोटीचे व्याज आकारण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :**(१) औरंगाबाद महानगरपालिकेने आयडीबीआय बँकेकडून एकूण रक्कम रुपये १९२.२४ कोटी इतके कर्ज घेतले असून त्यापैकी रुपये ९४.५० कोटी इतके कर्ज समांतर जलवाहिनी वॉटर पेमेंट रिझर्व्ह अकांऊट मध्ये जमा करणेकरिता घेतले आहे. हे खरे आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे वॉटर पेमेंट रिझर्व्ह अकांऊट मध्ये जमा करण्यासाठी घेतलेल्या रुनये ९४.५० कोटी कर्जाच्या हप्त्यावर आवश्यक मालमत्ता तारण न ठेल्यामुळे दिनांक १ एप्रिल, २०१३ ते २८ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीसाठी रुपये १.७१ कोटी इतके अतिरिक्त व्याज बँकेने औरंगाबाद महानगरपालिकेस आकारणी केलेले आहे. तर उर्वरित रक्कम ९७.७४ कोटी कर्जाच्या हप्त्यावर आवश्यक मालमत्ता तारण न ठेवल्यामुळे दिनांक २४ मे २०१२ ते ३१ मार्च, २०१४ कालावधीत रुपये १.८० कोटी इतके अतिरीक्त व्याज बँकेने औरंगाबाद महानगरपालिकेस आकारणी केलेले आहे.
(३) व (४) एकूण कर्ज १९२.२४ कोटी पैकी रुपये ९७.७४ कोटी कर्जाच्या रकमेसाठी रुपये १५६ बँकेकडून किंमतीची मालमत्ता तारण ठेवल्यामुळे बँकेकडून ९७.७४ कोटी कर्जाच्या रकमेवरील अतिरिक्त व्याज दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून बंदी केलेले आहे. उर्वरित मालमत्ता तारण ठेवण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अंतिम टप्प्यात आहे.

---

**जळगांव जिल्हयातील तापी नदीवरील मेगा रिचार्ज स्किम बाबत**

**(२६) १४३८१ (०८-०४-२०१५). श्री. हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील तापी नदीवर मेगा रिचार्ज स्किम (महाकाय जलपुनर्भरण योजना) राबविण्यासाठी शासनाने सर्व्हे करण्यासाठी २२ कोटी रु. मंजूर केलेले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या सर्व्हेचे काम कधी सुरु होणार व त्यासाठी गती देण्याचे शासनाचे धोरण व शासन करीत असलेली कार्यवाही काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०६-२०१५) :** (१) होय.
(२) निधी उपलब्धतेनुसार सदर योजनेच्या उर्वरित सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात येईल.

---

**वसई विरार शहर महापालिका हद्दीत वारंवार खंडीत होणा-या विजेच्या समस्यांबाबत**

**(२७) १४४१५ (०७-०४-२०१५). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई विरार शहर महानगर पालिका हद्दीत औद्योगिक वसाहती व नागरी वसाहतीचे प्रमाण सतत वाढत असून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीव्दारे करण्यात येणा-या विजपुरवठ्याच्या प्रमाणांत खुप कमतरता व वीजपुरवठा वारंवार खंडीत होण्याच्या तक्रारीबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास दि. २४.१२.२०१४ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शहरातील वीज वितरण प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी ६७ कोटी रूपये खर्चाच्या योजनेचा परिपुर्ण प्रस्ताव मुख्य अभियंता कार्यालयास सादर करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळून विजपुरवठा व विजवितरण प्रणालीमध्ये सुधारणा होणेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) वसई विरार शहरातील वीज वितरण प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी वसई तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित केलेली अंदाजीत रुपये ७० कोटीची कामे आय.पी.डी.एस. व दिनदयाल उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेतंर्गत समाविष्ट केली असून सदर योजनेचे प्रस्ताव मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहे.

---

**वसई तालुक्यातील सागरी किना-यालगतच्या गावांच्या**
**विजेच्या विविध अडचणीबाबत**

**(२८) १४४१९ (०७-०४-२०१५). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील गावा करीता केंद्र सरकारव्दारा पुरस्कृत राष्ट्रीय वादळ भय उपशमन प्रकल्प योजनेअंतर्गत भुमिगत केबलव्दारे वीज वितरण करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास दि.२४.१२.२०१४ रोजी वसई तालुक्यातील सागरी किनाऱ्यालगतच्या सुमारे १५ ते २० गावांच्या अडचणीबाबत तसेच उपरोक्त केंद्रसरकारच्या योजनेचा फायदा वसई तालुक्यांस मिळण्यासंबंधी शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व या गावांच्या विद्युतीकरणासाठी आर्थिक निधीचे वितरण करण्याबाबत शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) अशंत: खरे आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यालगतच्या चार जिल्हयातील १२ ठिकाणचे प्रस्ताव तयार करुन सादर करण्यात आले होते. यात वसई मंडळाने सादर केलेला सातपाटी येथील प्रस्तावाचा समावेश ओहे. सदर १२ ठिकाणापैकी प्रायोगिक तत्वावर अलिबाग येथील प्रस्ताव निवडण्यात आला आहे.

---

**राज्यात जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचे दर कमी करण्याबाबत**
**ग्राहक पंचायतीने केलेली मागणी**

**(२९) १४४३० (०७-०४-२०१५). श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डिझेल, पेट्रोलचे दर कमी झाले तरी जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचे दर कमी झाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राहक हिताच्या दृष्टीकोनातून जीवनावश्यक वस्तूचे दर कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे ग्राहक पंचायतीने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने उक्त मागणीची दखल घेऊन जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचे दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ तसेच काळाबाजार प्रतिबंध व जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा, १९८० अंतर्गत सन २०१३ ते २०१५ या कालावधीत एकूण १९४३ धाडी घालण्यात आल्या असून एकूण २८२१ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. एकूण ४९५ गुन्हे दाखल झालेले असून रु.३०,५६,९४,६०२/- किंमतीच्या वस्तू जप्त करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील गोरेगाव उपनगरातील चित्रनगरीचा पुनर्विकास करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३०) १४४५४ (०७-०४-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील गोरेगाव उपनगरात १९७७ पासून महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी कार्यरत आहे. या चित्रनगरीचा पुनर्विकास करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळाकडून सन २०११ मध्ये शासनाच्या मान्यतेसाठी बृहत आराखड्यासह पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाच्या संबंधित विभागांचे म्हणजेच नियोजन, वित्त, महसूल व वन विभाग इत्यादी यांचे अभिप्राय प्राप्त करून पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेकरिता केंव्हापर्यन्त सादर करणे अपेक्षित आहे?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१५) :**(१) होय.

(२) महामंडळाने ऑक्टोबर, २०१३ मध्ये शासनाला प्रस्ताव सादर केला आहे.

(३) होय.

(४) सर्व संबंधित विभागांच्या सूचना/अभिप्राय यास अनुलक्षून चर्चा, सादरीकरण आवश्यक ते बदल यासही काही कालावधी लागतो. या प्रकल्पाची व्यापकता लक्षात घेता तसेच अंमलबजावणी पूर्व नियोजनात जास्तीत जास्त अचूकता व सुनियंत्रण येण्यासाठी संबंधितांशी चर्चा व त्यास अनुलक्षून सुधारण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी लवकरच प्रस्ताव सादर होईल.

---

**दक्षिण मुंबईतील दि कॅथेड्रल अ‍ॅण्ड जॉन कानन स्कूल या शाळेत २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशांचे बुकींग आधीच करुन घेतले असल्याबाबत**

**(३१) १४४५६ (०९-०४-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील दि कॅथेड्रल अ‍ॅण्ड जॉन कानन स्कूल या शाळेत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशांचे बुकींग आधीच करुन घेतले असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शाळा ही इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशनशी (आयसीएसई) संलग्नित असल्याने शाळेला राज्य शासनाचे सर्वच नियम वा संकेताचे पालन करणे बंधनकारक असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्तीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यामुळे शाळेला दक्षिण विभागाच्या शिक्षण निरीक्षकांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीअंती सदरील शाळेच्या व्यवस्थापनेवर व संचालकांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंदर्भातील राज्याचे नियम धुडकावल्यामुळे शाळेला दक्षिण विभागाच्या शिक्षण निरीक्षकांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी शिक्षण उपसंचालक स्तरावर चौकशी करण्यात आली आहे. शाळेचे ना हरकत प्रमाणपत्रा रद्द करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्न दुधना प्रकल्प सेलू (जि. परभणी) या प्रकल्पाच्या कामाचा प्रगतीबाबत**

**(३२) १४४६४ (०८-०४-२०१५). श्री. विजय भांबळे (जिंतूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न दुधना प्रकल्प सेलू जि.परभणी या प्रकल्पाच्या कामाची प्रगती व प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे,

(२) तसेच, या प्रकल्पाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) तसेच, या प्रकल्पाचे काम मंद गतीने सुरु असून त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) निम्न दुधना प्रकल्पाच्या धरणाचे मुख्य काम भौतिकदृष्टया पूर्ण झालेले आहे. तसेच ६९ कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्याचे काम वितरीकासह ८०% पूर्ण झाले असून उजवा कालवा (४८ कि.मी. लांबी) अंशत: (५०%) पूर्ण झाला आहे. वितरण व्यवस्था ६०% पूर्ण झाली असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहेत.

(२) या प्रकल्पाचे काम सन १९९४-९५ मध्ये सुरु झाले असून, मार्च २०१५ पर्यंत या प्रकल्पावर रु.१३७४.७१ कोटी इतका खर्च झाला आहे.

(३) प्रकल्पाचे काम मंदगतीने सुरु नाही. भूसंपदनातील अडचणींचे निराकरण व निधीच्या उपलब्धतेनुसार हा प्रकल्प पूर्ण करण्यात येत आहे.

---

**सातारा जिल्हयासाठी मनरेगा योजनेबाबत**

**(३३) १४४७५ (०८-०४-२०१५). श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयासाठी मनरेगा योजनेसाठी सन २०१४ मध्ये २० कोटी ७४ लाख रुपयांचा निधी मिळाला असतांना सदर निधीतील १४ कोटी ८५ लाख खर्च करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार योजनेचा निधी पूर्ण क्षमतेने खर्च न करणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणी प्रवण योजना आहे. या योजनेमध्ये मागणीनुसार मजुरांना कामे दिली जातात. सन २०१४-१५ करीता सातारा जिल्हयासाठी ७.२३ लक्ष मनुष्यदिन इतके लेबर बजेट देण्या आले होते. निर्मित मनुष्यदिनाच्या अनुषंगाने सन २०१४-१५ मध्ये सातारा जिल्हयाचा योजनेवर रु.२१.५७ कोटी इतका खर्च झाला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील नांदगांव, मालेगांव व येवला या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी वीज पंपांना विज वितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा करण्यात आलेला नसल्याबाबत**

**(३४) १४४७८ (०७-०४-२०१५). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव, मालेगांव व येवला या तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी सन २०१० पासुन कृषी विज पंपासाठी विज जोडण्या मिळणेसाठी अनामत रक्कम भरूनही आजतागायत शेतकऱ्यांच्या कृषी वीज पंपांना विज वितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या कृषी विज पंपांना विज जोडण्या देण्यात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) उपरोक्त तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी विज पंपाना विज जोडण्या देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. दिनांक ३१.३.२०१५ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषिपंप वीज जोडण्या खालीलप्रमाणे देण्यात आल्या आहेत :-

१) मालेगांव तालुका - १७१५,

२) नांदगांव तालुका - २५८२,

३) येवला तालुका - ३६५१

(२) मालेगांव तालुक्यामध्ये मालेगांव विभागातंर्गत कृषी पंप वीज जोडणीर देण्याकरीता एकूण ६ निविदा एस.पी.ए. योजनेतंर्गत मंडळ कार्यालयातर्फे जानेवारी २०१४ मध्ये काढण्यात आल्या होत्या. त्यापैकी दाभाडी उपविभागाची एक निविदा मंजूर करण्यात आली असून दाभाडी उपविभागात प्रलंबित कृषीपंप वीज जोडणीपैकी एकूण ११० जोडण्याचे काम पूण्र झाले असून उर्वरित कृषीपंप वीज जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वरित पाच निविदा मंजुरीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच नांदगाव व येवला तालुक्यामध्ये डिसेंबर-२०१४ अखेरच्या कृषी पंपाना वीज जोउणी देण्याचे काम हे पायाभूत आराखडा-२ या योजनेंतर्गत देण्यात आलेले आहे. सदरचे काम हे इ.एम.सी. जेव्ही श्रीनिवास इलेक्ट्रीक्लस यांना देण्यात आले असून आतापर्यंत नांदगाव तालुक्यातमध्ये एकूण ११२ व येवला तालुक्यामध्ये एकूण १२ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(३) उपरोक्त तालुक्यामध्ये कृषी विज पंपाना जोडण्या देण्याचे काम ज्येष्ठता यादीप्रमाणे सुरु आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातील मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव या विभागाअंतर्गत असलेल्या नांदगाव तालुक्यातील नाग्या साक्या पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्याची अनेक वर्षापासून दुरुस्तीबाबत**

**(३५) १४४८० (०८-०४-२०१५). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव या विभागाअंतर्गत असलेल्या नांदगांव तालुक्यातील नाग्या साक्या पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यांची अनेक वर्षापासून दुरुस्ती न झाल्यामुळे कालवे ठिकठिकाणी फुटलेले असुन नादुरुस्त अवस्थेत आहेत त्यामुळे माेठया प्रमाणात पाण्याची गळती होवुन पाण्याचा अपव्यय होतो हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आलेले आहे ?

(४) तसेच, नाग्या साक्या पाटबंधारे प्रकल्पाच्या कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे ?

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

देखभाल दुरुस्ती अभावी कालवा फुटलेला नाही. परंतू कालव्याची खोदाई मुरुम भूस्तरातून जात असल्याने काही प्रमाणात गळती होते. तसेच साकोरे गावाजवळील उजव्या कालव्यावरील चारी क्र.१ वरील सा.क्र.७२० मी. ते २१०० मी लांबीतील कालवा हा उंच भरावातून (५ ते ६ मी.) जात असल्याने काही प्रमाणात गळती होते.

(४) नागासाक्या उजव्या कालव्यावरील चारी क्र.१ वरील सा.क्र.७२० मी. ते २१०० मी. लांबीतील भरावा भागातील कामाचे अंदाजपत्रक क्षेत्रीय स्तरावर तयार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपुरी शहरातील जिल्हा परिषदेच्या शासकीय विश्रामगृहाचे व खालची पेठ येथील धर्मशाळेच्या इमारतीचे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याबाबत.**

**(३६) १४४८५ (०८-०४-२०१५). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी पंचायत समिती अंतर्गत पंचायत समितीच्या नविन इमारतीचे, इगतपुरी शहरातील जिल्हा परिषदेच्या शासकीय विश्रामगृहाचे व खालची पेठ येथील धर्मशाळेच्या इमारतीचे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने उपरोक्त कामांची सखोल चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,

(३) चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुटीच्या उर्ध्व गोदावरी खो-यात पाणी साठा वाढविण्यासाठी पश्चिम वाहिनीचे पाणी पुर्वेकडे वळविण्यासंदर्भात**

**(३७) १४५०० (०८-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुटीच्या उर्ध्व गोदावरी खो-यात पाणीसाठा वाढविण्यासाठी पश्चिम वाहिनीचे पाणी पुर्वेकडे वळविण्यासंदर्भात शासनस्तरावर काही उपाययोजना करणार आहे काय ?

(२) असल्यास त्याबाबतीतील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

(३) तसेच,याबाबतीतील कार्यवाही शासन कधी करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पण गोदावरी खो-यात वळविण्यासाठीच्या १७ प्रवाही वळण योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. असून ६ प्रवाही वळण योजनेची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहे उर्वरित ११ प्रवाही वळण योजनेंची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत.

दरणगंगा (एकदरे) ते गोदावरी खोरे नदी प्रकल्पाचे (५.०५ अघफू) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत दि.१२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांना विनंती करण्यात आली आहे.

---

**शिर्डीकरिता निळवंडे धरणातुन पाईपलाईनने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात**

**(३८) १४५०१ (०८-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डीकरिता निळवंडे धरणातुन पाईपलाईनने पाणीपुरवठा करणार असल्याचे खरे आहे काय ?

(२) असल्यास, कोपरगांव शहरासाठी पाणीपुरवठा होणेकामी सदरची पाईपलाईन कोपरगांव पर्यंत वाढविणार आहे काय ?

(३) तसेच, कोपरगांव शहर व परिसराला पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) अदयाप याबाबतीतील काहीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) होय, प्रस्तावित आहे.

(२) व (३) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अहमदनगर यांचेमार्फत सर्वेक्षणाचे काम हाती घेण्याबाबतच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालखेड डाव्या कालव्यांतर्गत कोपरगांव तालुक्यातील गावांना टेल भागापर्यंत पाणी मिळत नसल्याबाबत**

**(३९) १४५०२ (०८-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड डाव्या कालव्यांतर्गत कोपरगांव तालुक्यातील गावांना टेल भागापर्यंत पाणी मिळत नाही, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, पालखेड डाव्या कालव्यांतर्गत कोपरगांव तालुक्यातील टेल भागापर्यंत पाणी उपलब्ध करण्याबाबतची भुमिका काय आहे ?

(३) तसेच, कोपरगांव तालुक्यातील गावांना टेल भागापर्यंत पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

(४) अदयाप काहीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

पालखेड डावा कालवा हा कि.मी. ११० (वितरिका क्र.४५) पर्यंतच आठमाही कालवा आहे. कि.मी११० ते १२८.५ पर्यंत खरीप कालवा आहे. खरीप कालव्यात पावसाळ्यात धरण overflow झाले तरच पाणी सोडण्यात येते.

कोपरगांव तालुक्यातील वितरिका क्र.३६ व ४५ वरील सहकारी पाणी वापर संस्थांना पाणी पुरवठा केला जातो, पालखेड डावा कालवा वितरिका क्र.४६ ते ५२ हा खरीप कालव आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मंजूर प्रकल्प अहवालातील नियोजनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निळवंडे धरणाच्या कालव्यांच्या कामांच्या निधीबाबत.**

**(४०) १४५०३ (०७-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे धरणाच्या कालव्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध नाही, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, शासन या कामासाठी कधी व किती निधी उपलब्ध करुन देणार आहे.

(३) तसेच, याबाबतीतील शासनाने केलेल्या कार्यवाहीची सदस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) नाही.

(२) सदर २०१५-२०१६ करिता निळवंडे कालव्यांच्या कामासाठी रु.३३.०० कोटी इतके अनुदान मंजूर आहे.

(३) निधी उपलब्धतेनुसार कामे चालु आहेत.

---

**गोदावरी कालव्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करणेबाबत**

**(४१) १४५०५ (०८-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी डावा व उजवा कालव्यांची दुरावस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास, कालवे दुरुस्ती करिता शासनस्तरावर निधी उपलब्ध करणेबाबत काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) कार्यवाही करण्याबाबत शासन प्रस्तावित नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

गोदावरील कालव्याची कामे सन १९११ ते १९६१ या कालावधीत पुर्ण झालेली आहेत. सदरील बांधकामांना १०० वर्षे पूर्ण झाली असून त्यांचे उपयुक्त आयुष्य संपलेले असल्याने कालव्यांवरील मातीकाम व सर्व ३६४ बांधकामांचे मजबुतीकरण/पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.

(२) सन १९८६ ते २०१३ पर्यंत गोदावरील कालवे नुतनीकरणाच्या २८५६ सघमी मातीकाम व ७४ बांधकामांच्या मजबुतीकरणावर व नव्याने बांधकामाच्या ४७ कामांच्या प्रस्तावास दिनांक ०६.०८.२०१२ रोजी रु.७५८२.३१ लक्ष करीता प्रशासकीय मान्याता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून सन २०१३-१४ साठी रु.१२०५.००५ लक्ष, सन २०१४-१५ साठी रु.१०५०.०० लक्ष व सन २०१५-१६ साठी १४००.०० रु. लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या कामांसाठी सपुर्ण निधी उपलबध होणेच्या दृष्टीने नाबार्ड-२० अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आधार कार्डच्या माहितीचे योग्य प्रकारे जतन होत नसल्याबाबत**

**(४२) १४५११ (०७-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ. आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आधार कार्डच्या माध्यमातून बायोमेट्रीक स्वरुपात माहिती साठवली जाते सदर माहितीचे योग्य प्रकारे जतन होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणीदारांना नोंदणी केल्यानंतरचे आधार कार्ड दोन ते तीन वर्षाने मिळते किंवा माहितीची योग्य काळजी न घेतल्याने नोंदणीच रद्द होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१५) :** (१) बायोमेट्रिक माहिती केंद्र शासनाच्या भारतीय विशिष्ठ ओळख प्राधिकरणामार्फत (UIDAI) जतन करण्यात येते.
(२), (३) व (४) आधार नोंदणीबाबतचा डेटा व आधार कार्ड वाटपाचे काम (UIDAI) व्दारे केले जाते. नागरिकांना अधिक सुविधा देण्यासाठी कायमस्वरुपी नोंदणी केंद्र (PEC) स्थापन करण्यात आले आहे.

---

**डोंगरधाव मोहाडी (जि.भंडारा) येथे कृषी विभागाची पडीत शेतजमीन असल्याची व त्या जमिनीवर शासकीय कृषि महाविद्यालय स्थापनेची केलेली मागणी**

**(४३) १४५१३ (०८-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरघाव मोहाडी, (जि.भंडारा) येथे कृषी विभागाची पडीत शेतजमीन असल्याची व त्या जमिनीवर शासकीय कृषि महाविद्यालय स्थापनेची मागणी कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यात कृषी महविद्यालय स्थापनेची योजना आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यात नवीन कृषी महाविद्यालय स्थापनेच्या अनुषंगाने कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे स्तरावर सुरू आहे. सदरचा आराखडा शासनास प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करता येऊ शकेल.

---

**बावनथडीच्या लाभक्षेत्रात भंडारा जिल्हयातील मोहाडी, तुमसर तालुक्यातील १७००० हेक्टर जमीन लाभ क्षेत्रात गेलेल्या जमीनीच्या शेतक-यांना मोबदला न मिळाल्याबाबत**

**(४४) १४५१५ (०८-०४-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावनथडीच्या लाभक्षेत्रात भंडारा जिल्हयातील मोहाडी, तुमसर तालुक्यातील १७००० हेक्टर जमीन लाभ क्षेत्रात असल्याची जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्यात गेलेल्या जमीनीच्या शेतक-यांना मोबदला न मिळाल्याने कालव्याची कामे अपुर्ण आहेत हे ही खरे आहे काय,

(३) त्यामुळे, जमीनीला लाभ मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(४) उक्त जमिनीला लाभ मिळण्याविषयी व शेतक-यांना मोबदला देण्याविषयी शासनाने या संबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१४) :**(१) होय. बानवथडी प्रकल्पाचे मंजूर प्रकल्प अहवालानुसार भंडारा जिल्हयातील तुमसर, मोहाडी व भंडारा तालुक्यातील एकूण १७५३७ हेक्टर क्षेत्र लाभक्षेत्रात येते.

(२) अंशत: खरे आहे. मुख्य कालवा व शाखा कालव्याचे कामे पुर्ण झाली आहेत. वितरीका व लघु कालव्यांची कामे ९० टक्के लांबीत पूर्ण आहेत. कालव्यासाठी लागणाऱ्या जमिनीपैकी ८१ टक्के जमिनीचे संपादन झाले आहे. उर्वरित भूसंपादन प्रकरणे प्रगतीत आहेत. भू-संपादन तसेच रेल्वे रोड क्रॉसिंग बांधाकामाअभवी सद्या ५१६६ हेक्टर क्षेत्र लाभापासून वंचित आहेत.

(३) आवश्यक जमिनीचे भूसंपादन व उर्वरित कामे पूर्ण करून उर्वरित क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजन करून त्यानुसार कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवाजीनगर, पुणे येथे कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीचे काम मंदगतीने सुरु असल्याबाबत**

**(४५) १४५१७ (१३-०६-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर, पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीचे काम मंदगतीने सुरु असून, कौटुंबिक न्यायालयाला २६ वर्षे पूर्ण होऊन देखील न्यायालय स्वतःच्या जागेत जाऊ शकले नसल्याने पक्षकार आणि वकिलांकडून मोठया प्रमाणावर नाराजी व्यक्त झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१५)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) शिवाजीनगर, पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामामध्ये नकाशे व संकल्पचित्र यामधील मोठ्या बदलामुळे व काही अपरिहार्य करणांमुळे विलंब झालेला आहे. माहे मार्चख, २०१५ अखेरपर्यंत या इमारतीचे मुख्य बांधकाम पूर्ण झालेले आहे. या नीवन जागत कौटंबिक न्यायलय स्थलांतरीत करण्याकरीता फर्निचर व इतर संकीर्ण बाबींची आवश्यकता आहे. सदर इमारतीच्या बांधकामचा रु.१६.६८ कोटी इतक्या अंदाजित खर्चाचा सुधारित प्रशसकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून, तो तांत्रिक तपासणी व छाननीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर इमारतीचे बांधकाम त्वरेने पूर्ण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे.

---

**केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत पुणे शहराचा समावेश व्हावा यासाठी शासनाच्यावतीने विशेष अधिकारी नेमण्याबाबत**

**(४६) १४५१९ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत पुणे शहराचा समावेश व्हावा यासाठी शासनाच्यावतीने विशेष अधिकारी नेमण्याच्या निर्णय शासनाने घेतला असल्याची बाब माहे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) स्मार्ट सिटीच्या निकषात पुणे शहर पात्र ठरावे यासाठी शासनाच्या वतीने सकारात्मक पावल उचलली जात आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) स्मार्ट सिटी योजनेबाबत मार्गदर्शक सूचना अद्याप केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील (सीओईपी) ५४ प्राध्यापकांच्या नियुक्त्या शासनाने अपात्र ठरविल्याबाबत**

**(४७) १४५२७ (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील (सीओईपी) ५४ प्राध्यापकांच्या नियुक्त्या राज्य शासनाने अपात्र ठरविल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) अभियांत्रिकी महाविद्यालय राजपत्रित अध्यापक/अधिकारी संघ यांनी अनियमित पिनयुक्त्यांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ४०४६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.११.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी संचालनालय स्तरावर सहसंचालक (आस्थापना) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या अहवाल व त्याअनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण संचालकनायल यांनी शासनास सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ५४ उमेदवारांच्या नियुक्त्या अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींचा अभ्यास आणि संशोधन करण्याबाबत**

**(४८) १४५२८ (१०-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आदिवासी संशोधन संस्थेला पन्नास वर्षे झाली तरी अद्याप आदिवासी लोककलांचा सुध्दा पुरेसा अभ्यास आणि जतन केले नसल्याची बाब फेब्रुवारी २०१५ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आली हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२६-०५-२०१५) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहराच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या मंजूरीसाठी स्पेशल पर्पज व्हेईकल कंपनीबाबत

**(४९) १४५३६ (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या मंजूरीसाठी आवश्यक असणारी स्पेशल पर्पज व्हेईकल कंपनी पुणे महानगरपालिकेने स्थापन केली नाही ही बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या पुणे महानगर मेट्रो रेल काॅर्पोरेशन या स्पेशल पर्पज व्हेईकल कंपनीचे मेमोरन्डम ऑफ असोसिएशन व आर्टिकल ऑफ असोसिएशन दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी केंद्रशासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

---

### मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाची साहित्य अकादमीच्या भाषिक समितीने केंद्र शासनाला केलेली शिफारस

**(५०) १४५५२ (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाची साहित्य अकादमीच्या भाषिक समितीने केंद्र शासनाला शिफारस केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) होय.
(२) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविलेल्या राज्य शासनाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांनी त्यांच्या शिफारसी संस्कृती मंत्रालयाला कळविलेल्या आहेत. या प्रस्तावाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपूरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.